**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये सुधारणा केल्यानुसार नियम तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. अशसे-२०२३/प्र.क्र. १४७/नवि-१४**
४ था मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १९ मे, २०२३.

**वाचा:**-१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे-१४०७/८५५/प्र.क्र.३१०/०७/नवि-२४, दि.१४.०९.२००७.
२. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.मअसे-२०२३/५९/७०३, दि.२५.०४.२०२३.
३. सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि.११.०५.२०२३.

**शासन निर्णय:-**

राज्यात महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये सुधारणा करून संदर्भ क्र.३ येथील अधिनियम दि.११.०५.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमात केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने, प्रारुप नियम तयार करण्याकरीता संदर्भ क्र.१ येथील दि.१४.०९.२००७ रोजीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांनी प्रस्तावित केल्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय | - अध्यक्ष |
| २. | प्रमुख अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका | - सदस्य |
| ३. | मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | - सदस्य |
| ४. | मुख्य अग्निशमन अधिकारी, ठाणे महानगरपालिका | - सदस्य |
| ५. | सहा.मुख्य अग्निशमन अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | - सदस्य |
| ६. | श्री.अरविंद मांडके, माजी मुख्य अग्निशमन अधिकारी, शहर व औद्योगिक विकास महामंडळ(महाराष्ट्र) मर्यादित. | - सदस्य |
| ७. | सहाय्यक संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय | - सदस्य |
| ८. | अधिक्षक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय | - सदस्य सचिव |

२. सदर समिती खाली नमूद अटी व शर्ती यांच्या अधीन राहून काम करील:-

१) सुधारीत नियम तयार करताना यासंदर्भात तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास समितीच्या अध्यक्षांनी आवश्यकतेनुसार तांत्रिक तज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीत निमंत्रीत करावे.

२) समितीने अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियम, २००९ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबतचा अहवाल/ शिफारशी दि.१५.०६.२०२३ पूर्वी शासनास सादर कराव्यात.

३) समितीच्या सदस्यांना प्रवास व दैनिक भत्त्यावरील खर्च संबंधित आस्थापना करेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२३०५१९१४४६२५८९२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अ.का.लक्कस)**
**अवर सचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव(नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव(नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, बृहन्मुंबई/ ठाणे महानगरपालिका.
६) आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
७) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.म., मुंबई.
९) श्री.अरविंद मांडके, माजी मुख्य अग्निशमन अधिकारी.
१०) निवडनस्ती (नवि-१४).